# सामान्य प्रशासन विभाग

## माहिती

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव** | सामान्य प्रशासन विभाग |
| **विभाग प्रमुखाचे पदनाम** | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| **विभागाचा दुरध्वनी क्रमांक** | ०२५२०२४०५९४ |

सामान्य प्रशासन विभाग हा पंचायत समितीच्या प्रशासनातील महत्त्वाचा विभाग आहे. पंचायत समितीतील सर्व विभागांना आस्थापनात्मक मुद्दे, प्रकरणे इ. वर मार्गदर्शन सामान्य प्रशासन विभागामार्फत दिले जाते व सर्व विभागांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवले जाते. या विभागाचे कामकाज पूढील प्रमाणे-

**पदोन्नती –**

पंचायत समितीकडे कार्यरत असणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना शासनाच्या तरतूदींनुसार वरिष्ठ पदावर पदोन्नती पद असेल तेथे पदोन्नती देणे.

**खातेनिहाय चौकशी –**

(कर्मचारी कार्यरत असतांना त्यांचेकडे सुपूर्द केलेल्या कामामध्ये अनियमीतता, गैरव्यवहार वा अपहार यासारख्या गंभीर स्वरूपाच्या घटना गुन्हे घडतात अशावेळी त्याची पुनरावृत्ती होवू नये व प्रतिबंध बसावा आणि त्यातील सत्य-असत्यता पडताळून जबाबदारी निश्चित करणे व दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांना गुन्ह्याच्या गांभिर्यानुसार शासनाच्या तरतूदींनूसार शिक्षा निश्चित करणे).